# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र.०२१७-२७४४७७१/ ७२/ ७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in, ई-मेल: affiliation@sus.ac.in


**[ संलग्नता विभाग विस्तारीत क्रमांक : १२२ ]**

## परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांना, शिक्षणक्षेत्रातील विविध तज्ज्ञ घटकांना, शिक्षणप्रेमी व मा. अधिसभा सदस्यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, सन २०२४ ते २०२९ या कालावधीच्या पंचवार्षिक सर्वसमावेशक सम्यक योजनेस (बृहत आराखडा) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ७७ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची मान्यता घेण्याकरिता प्रस्तुत विद्यापीठाची सन २०२४ ते २०२९ या कालावधीची पंचवार्षिक सर्वसमावेशक सम्यक योजना (बृहत आराखडा) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०७ मधील तरतुदीनुसार तयार करावयाचे आहे. सदरील सम्यक योजना तयार करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशी, नवीन शैक्षणिक धोरण २०२० व विद्यापीठ अधिनियमातील तरतूदी विचारात घेऊन कौशल्य आधारित व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांना प्राधान्य देऊन तयार करावयाची आहे. त्याकरिता शिक्षण क्षेत्रातील विविध तज्ज्ञ घटकांकडून तसेच शिक्षणप्रेमीकडून प्रश्नावली स्वरुपात गुगल फॉर्मव्दारे (ऑनलाईन पध्दतीने) सूचना मागविण्यात येत आहे. सन २०२४ ते २०२९ या पंचवार्षिक सम्यक योजनेसंदर्भातील आपली माहिती/सूचना विद्यापीठाच्या अधिकृत http://www.sus.ac.in या संकेतस्थळावरील Circular व Academic Research and Development या मथळयाखाली Affiliation Section मध्ये खालील तक्त्यात नमूद केलेल्या लिंकनुसार गुगल फॉर्मव्दारे भरावयाची आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. कुलगुरु/ प्र- कुलगुरु/ कुलसचिव | https://forms.gle/DdLfc5xYjMYbHgSQ8 |
| २ | मा. अधिसभा सदस्य | https://forms.gle/L62C7hQa6eUx4oFm9 |
| ३ | मा. संस्थाचालक | https://forms.gle/5kHzohNARtzeYYwE6 |
| ४ | मा. प्राचार्य/संचालक | https://forms.gle/956VRVsDd4VXby9X6 |
| ५ | शिक्षक | https://forms.gle/a1pQhcg57qdEQpyz8 |
| ६ | शिक्षकेतर आधिकारी व कर्मचारी | https://forms.gle/y4Xgtqz2Eopdg4HL8 |
| ७ | विद्यार्थी | https://forms.gle/AwQLM3FzRmS8Syh39 |
| ८ | पालक | https://forms.gle/rPDQ2B2kBu1mQp8H6 |
| ९ | सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती | https://forms.gle/y14Brgmb5vXWq2fD6 |
| १० | उद्योजक | https://forms.gle/1GbDwB4XBzQhLsvaA |

सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सर्वेक्षण प्रश्नावली संबंधित घटकांकडुन ( संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, महाविद्यालयाच्या परिसराजवळील सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती व उद्योजक ) उक्त लिंकव्दारे गुगलफॉर्म भरुन घेण्याबाबत महाविद्यालयात कार्यशाळा आयोजित करुन माहिती भरण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावयाची आहे.

सन २०२४ ते २०२९ या पंचवार्षिक सम्यक योजनेच्या संदर्भातील गुगल फॉर्मची लिंक दि. २०/०२/२०२३ ते दि.२८/०२/२०२३ या कालावधीत सुरु राहील. गुगलफॉर्म भरण्यासंदर्भातील कार्यवाही झाल्यानंतर शेवटी फॉर्म Submit करावेत.

17.2.23

प्र. कुलसचिव

जा.क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/सम्यक योजना परिपत्रक/२०२३/1305

दिनांक : 17 FEB 2023

प्रति,

१) मा. मा. कुलगुरु कार्यालय/ कुलसचिव कार्यालय.

२) मा. अधिसभा सदस्य, पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

३) मा. प्राचार्य/ संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये, पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

४) विभाग प्रमुख, सर्व प्रशासकिय विभाग व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर.

५) शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी , विद्यापीठ परिसर व संलग्नित महाविद्यालये

उपरोक्त परिपत्रक विविध घटकांच्या निदर्शनास आणून परिपत्रकानुसार विहित कार्यवाही करावी.